अंतिम कारणे दाखवा नोटीस

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
जा.क्र.आरोग्य/आस्था५/९५८/१७
नाशिक दिनांक :- २८/१२/२०१७

प्रति

श्रीम.रेखा नथु जाधव, आरोग्य सेविका (म)
हल्लीचे कार्यालय प्रा.आ.केंद्र.अंबासन, उपकेंद्र.बिजोरसे, ता. बागलाण.
व्दारा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, बागलाण.

तुम्ही प्रा.आ.केंद्र सोनज, उपकेंद्र.सावकारवाडी, ता. मालेगांव येथे कार्यरत असतांना नियमबाहय वर्तन केलेचे निदर्शनास आलेने तुम्हाला मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडिल आदेश आरोग्य/आस्था५/९१५/२०१६ दि.२३/०८/२०१६ अन्वये जिल्हा परिषद सेवेतुन निलंबित करण्यात आले होते. तुमचे विरुध्द खाते चौकशी सुरु करणेसाठी या कार्यालयाचे जा.क्र. आरोग्य/अस्था५/११६/२०१७ दिनांक ०१/०२/२०१७ अन्वये ज्ञापन व दोषारोप परिशिष्ट १ ते ४ देण्यात आले होते. विहीत मुदतीत ज्ञापनाचा खुलासा सादर न केल्याने तुमचे विरुध्दचे दोषारोपांची चौकशी करण्यासाठी या कार्यालयाचे आदेश क्रामंक आरोग्य/अस्था५/१२०२/२०१७ दि. ०५/०९/२०१७ अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक क्र.आरोग्य/जिआअधि/ वैयक्तीक/२०१७ दिनांक १६/११/२०१७ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. दोषारोपनिहाय चौकशी अधिकारी यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

| दोषारोप क्रमांक | दोषारोपाचे स्वरुप | चौकशी अधिकारी यांचा अभिप्राय |
|---|---|---|
| १. | कामी अनधिकृतपणे गैरहजर राहणे. | दोषारोप सिध्द होत नाही. |
| २ | मुख्यालयी न राहणे. | **दोषारोप अंशतः सिध्द होतो.** |
| ३ | शासकीय कागदपत्रांमध्ये चूकीच्या नोंदी घेवुन वरिष्ठांची दिशाभूल करणे. | **दोषारोप सिध्द होत आहे.** |
| ४ | ग्रामिण भागातील जनतेस आरोग्य सेवेपासून वंचीत ठेवणे. | **दोषारोप अंशतःसिध्द होतो.** |

चौकशी अहवालातील दोषारोपातील निष्कर्षात तुमचे विरुध्दचे ०४ दोषारोपांपैकी ०१ दोषारोप सिध्द होतो. उर्वरीत ०२ अंशत: सिध्द होतात. यावरुन तुम्ही महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे हे सिध्द होते. चौकशी अहवालाची प्रत यासोबत जोडुन पाठविणेत येत आहे. चौकशी अहवालाशी शिस्तभंग विषयक प्राधिकरण सहमत झाले असुन खातेचौकशी प्रकरणी आपणास शास्ती होणेबाबत शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणुन माझे मत पक्के झाले आहे.

त्यास्तव तुमचे विरुध्द **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ भाग ३ नियम ४** नुसार ---- दोन वेतनवाढ पुढच्या वेतनावर कायमस्वरुपी परिणाम होईल ---- याबाबतचा खुलासा सादर करावा. सदर प्रकरणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे दालनात दिनांक १५/१ /२०१८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. सुनावणीस आपण स्वत: अंतिम कारणे दाखवा नोटीसचे खुलाशासह उपस्थित रहावे.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नाशिक

**प्रत :-** तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती **बागलाण.**

२/- सोबत अंतिम कारणे दाखवा नोटीसच्या तीन प्रती जोडल्या आहेत. त्यातील एक प्रत श्रीम. जाधव, आरोग्य सेविका (म) यांना बजाविणेत येवुन दुसऱ्या प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन सदर प्रत इकडेस सादर करावी.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक